**प्रेसनोट दि. १३/०९/२०१८**

**“ पो.हवा. स्वतः ॲम्ब्युलन्स चालक होऊन बेवारस अनोळखी इसमास उपचार कामी ससुन हॉस्पीटल येथे घेऊन गेले बाबत..”**

**पो.हवा.५४७३ राहुल निगडे, पो.ना.४२८१ नवनाथ राणे, पो.उप.निरी.मनोज अभंग यांचे सामाजिक कार्य**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

दि.१३/०९/२०१८ रोजी गणेश उत्सव चालु होणार होता. दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये सर्वत्र बंदोबस्त लावण्यात आला होता. सदर दिवशी पोलीस नियंत्रण कक्ष,पुणे शहर येथुन दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे खबर आली की, फरशी पुल,जुना दत्तवाडी रोड,ओढयाचे जवळ रस्त्याचे कडेला एक अनोळखी इसम बेशुद्ध अवस्थेत पडलेला आहे. सदरची खबर प्राप्त होताच दत्तवाडी पोलीस चौकी येथे कर्तव्यावर असलेले पो.हवा.५४७३ राहुल निगडे, पो.ना.४२८१ नवनाथ राणे, पो.उप.निरी.मनोज अभंग असे सदर ठिकाणी तात्काळ पोहोचुन बेशुद्ध पडलेल्या अनोळखी इसमाची पाहणी केली व त्याची ओळख पटविण्यासाठी आजु-बाजूचे लोकांकडे व नातेवाईक मिळुन येतात का याबाबत चौकशी केली. परंतु कोणीही नातेवाईक न मिळुन आल्याने पोलीस हवालदार राहुल निगडे यांनी त्यांचे ओळखीचे सामाजिक कार्यकर्ते रुपेश तुरे यांचेशी संपर्क करुन त्याचेकडे असलेली खाजगी ॲम्ब्युलंसची मागणी केली असता ॲम्ब्युलंस उपलब्ध होती परंतु त्यावर ड्रायव्हर उपलब्ध नव्हता, सदरच्या अनोळखी इसमास उपचार कामी तात्काळ हॉस्पीटल येथे घेऊन जाणे गरजेचे असल्याने पोलीस हवालदार राहुल निगडे यांनी स्वतः ॲम्ब्युलंस चालवुन घेऊन येऊन पोलीस नाईक नवनाथ राणे यांचे मदतीने सदर अनोळखी इसमास ससुन हॉस्पीटल येथे उपचार कामी घेऊन गेले. ससुन हॉस्पीटल येथील डॉक्टरांनी सदर अनोळखी इसमाची तपासणी केली परंतु सदरचा इसम मयत झाला असल्याचे घोषीत केले. त्यानंतर स्वतः पोलीस हवालदार राहुल निगडे व पोलीस नाईक नवनाथ राणे यांनी त्या अनोळखी मयत इसमाचा पंचनामा व पुढील कार्यवाही केली.

पोलीस हवालदार राहुल निगडे यांनी स्वतः ॲम्ब्युलंस चालवुन स्वतःचे पैशाने ॲम्ब्युलंस मध्ये पेट्रोल भरुन कोणतेही नाते संबंध नसतांना,स्वतःचे नातेवाईक असल्याप्रमाणे अनोळखी इसमास उपचारास हॉस्पीटल येथे घेऊन गेले. त्यांचे सोबत पोलीस उप-निरीक्षक मनोज अभंग व पोलीस नाईक नवनाथ राणे यांनी सुद्धा त्यांचे कर्तव्य बजावुन पोलीस खात्यातील कर्तव्य परमोधर्म या म्हणीचा प्रत्यक्ष प्रत्यय आपल्या कृतीतुन आणुन दिला आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**



